ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3484, Licence No. 53.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख ३ जून, १९५३ | अंक २१

## विविध माहिती

**सर्वोदयासाठी खर्च**—गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यांत सर्वोदय योजना चालू करण्यासाठी मुंबई सरकारनें १९५३–५४ सालासाठी ४८,२३० रुपये मंजूर केले आहेत. त्यांपैकी १,५०० रुपये नवीन सुधारलेल्या प्रकारच्या शेतीच्या अवजारांसाठी खर्च करण्यांत येतील आणि २,५०० रुपये ट्यूब विहिरींसाठी खर्च होतील.

**ताजमहालवर जर्मन चित्रपट**—जर्मन बोलपटवाल्यांची एक तुकडी १४ वर्षांनंतर भारतांत येणार आहे. ह्या तुकडींत अवघे दोघेजण असून ते मुंबई, मद्रास व कलकत्ता येथील बोलपट स्टुडिओज पहाणार आहेत. भारतामधील प्रेक्षणीय स्थळांचे अनुबोध–पट काढण्याचा त्यांचा विचार असून त्यांत एक अनुबोधपट ताजमहालवर काढण्यांत येणार आहे.

**बांगड्यावरील कर रद्द करा**—अ. भारतीय बांगडी कारखानदार संघटनेचे चिटणीस, श्री. जी. के. वाघमारे ह्यांनीं भारतीय सरकारला व राज्य–सरकारांना अशी विनंती केली आहे कीं, बांगड्यावरील विक्रीकर रद्द करण्यांत यावा. बांगड्या ही वस्तू देशांतील कच्च्या मालापासून तयार करण्यांत येत असते. अशा वस्तूंना संरक्षण देण्याचें सरकारचें धोरण असल्यामुळें कर रद्द करण्याची मागणी करण्यांत आली आहे.

**भारतामधील सहकारी चळवळ**—भारतामध्यें सहकारी पद्धतीनें काम करणाऱ्या १,७३,२०० संस्था असून त्यांच्या सभासदांची संख्या १·३ कोटी आहे. सर्व सहकारी संस्थांचें खेळतें भांडवल सुमारें २३५ कोटी रुपये आहे असें समजतें.

**सीलोनची रबराची निर्यात**—गेल्या एप्रिल महिन्यांत सीलोननें ८,४७७ टन रबराची निर्यात केली. त्यापैकी ७५ टक्के रबर कम्युनिस्ट चीनकडे रवाना झालें. चीनच्या खालोखाल ब्रिटन, अमेरिका आणि जर्मनी ह्या देशांनीं रबर आयात केलें.

**अन्नपूर्णाचा प्रयोग यशस्वी**—दिल्ली डेहराडून एक्सप्रेसला ' अन्नपूर्णा ' डबा जोडण्यांत येत आहे. गेल्या २० तारखेला हा डबा प्रथमच जोडण्यांत आला असता गाडींतील प्रवाशांनीं त्याचा चांगला फायदा घेतला. डेहराडूनहून परत येतांना तर ७०० उतारूंनीं डब्यांतील स्वस्त अन्न–पदार्थांना उदार आश्रय दिला.

**जंगलें वाढविण्याचा प्रयत्न**—सौराष्ट्रांतील उजाड प्रदेशांत नवीन जंगलें वाढविण्याची दीर्घकालीन योजना सौराष्ट्र सरकारनें आखली आहे. जंगलाची वाढ झाल्यानें अधिक पाऊस पडेल, हवामानांत सुधारणा होईल आणि जमीनहि सुधारेल असें तज्ज्ञांचें मत आहे. ह्या योजनेवर ५० लाख रुपये खर्च करण्यांत येणार असून १,८०० चौरस मैलांत जंगलाची वाढ करण्यांत येईल. सर्व योजना पूर्ण होण्यास ४० वर्षें लागतील.

**संस्कृतला उत्तेजन**—संस्कृतच्या अभ्यासाला उत्तेजन देण्याच्या हेतूनें बिहार राज्य सरकारनें ४ संस्कृत कॉलेजें आणि ५ माध्यमिक शाळा काढण्याचें ठरविलें आहे. कॉलेजें पाटणा, रांची, भागलपूर आणि मुझफरपूर येथें काढण्यांत येतील.

**मरणापूर्वीचा त्याग**—न्यूयॉर्क येथें आंधळ्यांना दृष्टी देण्यासाठी डोळ्यांची एक बँक आठ वर्षांपूर्वी काढण्यांत आली आहे. ह्या संस्थेला ३,१०० मरणोन्मुख रोग्यांनीं मरणापूर्वी आपले डोळे काढून घेण्याची परवानगी दिली. बुबुळांचें कलम करण्याचें शिक्षण देण्याचें आणि डोळ्यांविषयीं संशोधन करण्याचें कामहि संस्था करत.

**मधमाशा पाळण्याचा धंदा**—मद्रास सरकारच्या शेती–सल्लागार अधिकाऱ्याच्या मतानें निलगिरी पर्वतावर मधमाशा पाळण्याचा धंदा केला तर तो व्यापारी दृष्ट्या यशस्वी होऊं शकेल. ह्याबाबत मद्रास सरकारला एक अहवाल लवकरच सादर करण्यांत येणार आहे. मधाची पैदास वाढविण्यासाठी परदेशांतून मधमाशा आणाव्या अशी सूचना करण्यांत आली आहे.

**१०,००० मैल वेगानें जाणारीं विमानें**—जर्मनींमधील फॉकवुल्फ कंपनीमध्यें युद्धकालांत काम करीत असलेलें विमान विषयक संशोधक प्रोफेसर टँक ह्यांनीं असें सांगितलें कीं दृष्टीच्या टप्प्यांत असलेल्या कालांतच ताशीं १,००० मैल वेगानें उड्डाण करणारीं जेटचीं विमानें तयार करतां येतील. परंतु त्यांची रचना सध्याच्या विमानापेक्षा वेगळी असेल. प्रो. टँक सध्या अर्जेंटायनाच्या सरकारला विमानासंबंधीं सल्ला देत असतात.

**मध्यभारतामधील शेती**—मध्यवर्ती ट्रॅक्टर संघटनेनें मध्यभारतामधील १,११,००० एकर जमीन नव्यानें लागवडीखालीं आणली होती. त्यापैकीं ९९ टक्के जमिनींत आतां शेती करण्यांत येत आहे. सुमारें १० लाख रुपये खर्च करून बांधबंदिस्तीचीं कामेंहि करण्यांत आलीं आहेत. त्यांचा फायदा १०,००० एकर जमिनीला मिळत आहे.

**नॉर्वेकडील मदत आली**—नॉर्वे व भारत ह्यांच्यांतील करारा-प्रमाणें नॉर्वे भारताला तांत्रिक मदत करणार आहे. ह्या करारा-प्रमाणें जलसंशोधन आणि मच्छीमारी ह्या दोन बाबतींत भारताला साह्य मिळणार आहे. एका स्वीडिश बोटींमधून ५३ टन वजनाची यंत्रसामुग्री मुंबई बंदरांत येऊन दाखल झाली आहे.

**पोस्ट खात्याला रेडिओचें साह्य**—कलोन (जर्मनी) येथील पोस्ट ऑफिसानें तारा धाडण्यासाठी एक नवीन सोय केली आहे. मुख्य पोस्ट ऑफिसमधील तारांचें ध्वनिमुद्रण करणारी एक फिरती मोटार ठेवण्यांत आली आहे. गाडी चालू असतांच तारेचें ध्वनिमुद्रण होतें आणि तारेच्या पत्त्यावर गाडी पुष्कळदां आधींच पोंचते. ही पद्धत फार यशस्वी झाल्याचें समजतें.

# कृतज्ञता

महाराष्ट्राची वयानें आणि मानानेंहि पहिली विमा कंपनी

## वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स

कंपनी लिमिटेड, सातारा

या संस्थेचें उज्ज्वल यश म्हणजे


कै. विमामहर्षि

## ★★ अण्णासाहेब चिरमुले ★★

यांच्या ठिकाणचे

अत्यंत सावध दूरदृष्टि
धीरगंभीर आशावादीपणा
एकनिष्ठ व अहर्निश उद्योगीपणा
तपस्याची निरपेक्ष सेवावृत्ति
माणसांची अचूक पारख
निरहंकारी बिनबोलकेपणा
रोमरोमांत भिनलेलें देशप्रेम
कुशल पण करारी नेतृत्व

इत्यादि अनेक गुणांचें फळ होय.



कै. अण्णासाहेब चिरमुले यांचे नेतृत्वाखाली

(१) सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि.
(२) युनायटेड वेस्टर्न बँक लि.
(३) वेस्टर्न इंडिया ट्रस्टी ॲण्ड एक्झिक्यूटर कंपनी लि.
(४) विमा मुद्रक आणि प्रकाशक लि.

या संस्थांप्रमाणेंच

वेस्टर्न इंडिया विमा कंपनी

ही संस्था १९११ सालीं स्थापन झाली व सर्व प्राथमिक अडचणी तरून जाऊन दृढतम पायावर उभी राहिली. महाराष्ट्रांतच नव्हे तर अखिल भारतांत एक नामवंत. आदर्श विमा कंपनी म्हणून गाजली, गाजत आहे व गाजत राहील अशी अपेक्षा आहे. त्या कै. अण्णासाहेबांचें लहानसें स्मारक

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीला

त्यांचेबद्दल वाटणाऱ्या कृतज्ञतेचें लहानसें प्रतीक म्हणजे ता. ११।५।५२ रोजीं सातारा येथें मोठ्या समारंभानें **कै. अण्णासाहेबांचे** लहानपणापासूनचे सहकारी **महर्षि अण्णासाहेब कर्वे** यांच्या हस्तें खुली होत असलेली

## " चिरमुले-निकेतन "

ही प्रासादतुल्य, भव्य रमणीय वास्तु होय. या वास्तूच्या साक्षीनें आम्ही ग्वाही देतों कीं वेस्टर्न इंडिया विमा-कंपनीचा ध्वज सदैव उंच फडकत ठेवण्याचा आम्हीं आटोकाट प्रयत्न करूं, व कै. अण्णासाहेबांचा कीर्तिसुगंध आणि त्यांची महान तत्त्वप्रणाली मेहमीं उज्ज्वल राहील असें करण्याचीहि आम्ही पराकाष्ठा करूं.

संचालक— वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि., सातारा

Tom & Bay Ltd., Poona 2.

# अर्थ

बुधवार, ता. ३ जून, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सरकारतर्फे प्रसिद्ध होणारी आकडेवार माहिती

सरकारतर्फे वेगवेगळ्या प्रकारची आर्थिक आंकडेवार माहिती वरचेवर प्रसिद्ध होत असते आणि तिचे आधारावर निष्कर्ष काढले जातात व धोरणें आंखलीं जातात. हे आंकडे नेहमींच बिनचूक किंवा विश्वासार्ह असतात, असें नाहीं. अन्नधान्याच्या पुरवठ्याबावत सरकारनें जमा केलेले आंकडे वस्तुस्थितिनिदर्शक नाहींत; अन्नाचा पुरवठा वाटतो त्यापेक्षा खरोखर ज्यास्त आहे आणि म्हणून विनियंत्रणाचें पाऊल हळुहळु टाकण्यास हरकत नाहीं, अशा युक्तिवादाच्या आधारावरच श्री. रफि अहंमद किडवाई ह्यांनीं अन्नधान्यविषयक धोरणांत जरा धाडसानें बदल घडवून आणला आणि आज तरी त्यांच्या ह्या धाडसाबद्दल टीका करण्याजोगी परिस्थिति राहिलेली दिसत नाहीं. घाऊक किंमतींचे इंडेक्स नंबर सरकार प्रसिद्ध करीत असतें आणि त्यावरून निष्कर्ष काढण्यांत येतात. परंतु तसें करतांना दक्षता का बाळगली पाहिजे आणि ते इंडेक्स नंबर तयार करण्याचे कामीं कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत, ह्याचें विवेचन "टाटा कार्टेली"नें आपल्या ताज्या अंकांत केलें आहे, तें उद्‌बोधक आहे. घाऊक किंमतींच्या इंडेक्सवरून पैशाची क्रयशक्ति बिनचूक ठरविणें कसें अयोग्य आहे हें त्यांत दाखवून दिलेलें आहे. ह्या इंडेक्ससाठी तुलनेकरितां युद्धपूर्व वर्ष घेतलें आहे. परंतु भारताची फाळणी होऊन पाकिस्तान वेगळा झाल्यामुळें आणि युद्धकाळांत व युद्धकाळानंतर कारखान्यांच्या महत्त्वांत वाढ झाली असल्यामुळें इंडेक्स नंबरामध्यें कच्च्या मालास भरमसाट महत्त्व प्राप्त झालेलें आहे आणि कारखान्यांतून तयार होणाऱ्या मालास अपुरें महत्त्व मिळत आहे. मालाची किंमत धरण्याच्या चुकीमुळें इंडेक्समध्यें सिमेंट, कोळसा किंवा कांच ह्यांचे मानानें कपास व ताग ह्यांच्या मालास अवास्तव महत्त्व प्राप्त झालें आहे. भारतांत उपभोगासाठी उपलब्ध असलेल्या जिनसांस इंडेक्समध्यें प्रमाणशिर प्रतिनिधित्व मिळालेलें नाहीं, हीहि एक त्यांतील उणीव आहे. भारताच्या अंतर्गत आर्थिक संसारांत ज्या जिनसास जें महत्त्व आहे, त्याचें प्रतिबिंब इंडेक्सच्या चढउतारांत निर्दोषपणें पडत नाहीं. कांहीं महत्त्वाच्या जिनसांचे जे बाजारभाव इंडेक्स तयार करतांना विचारांत घेतले जातात, ते प्रातिनिधिक नाहींत असेंहि आढळतें. वेगवेगळ्या ठिकाणच्या वेगवेगळ्या प्रकारच्या किती किंमती हिशेबांत घ्यावयाच्या आणि त्या किंमतींचा दर्जा काय आहे, ह्या गोष्टी महत्त्वाच्या असतात. संख्या वाढविल्या म्हणजे किंमती गोळा करण्याचा खर्च वाढतो हें खरें आहे; परंतु पादत्राणांच्या इंडेक्स नंबरापेक्षा तांदुळाचा इंडेक्स नंबर बिनचूक असणें जास्त महत्त्वाचें आहे. बाजारांतील प्रत्यक्ष परिस्थितींचें प्रतिबिंब किंमतींमध्यें पडलेलें असलें पाहिजे. सरकारच्या नियंत्रणाच्या योजनेबाहेरील मागणीपुरवठ्याचें चित्रहि इंडेक्स नंबरांत उमटलें पाहिजे. इंडेक्स नंबरांतील अन्न विभागांत तांदुळास अग्रस्थान आहे. परंतु, फक्त तीन ठिकाणच्या किंमतींवरून त्याचा इंडेक्स तयार केला जातो. पादत्राणांचा इंडेक्स तयार करतांना त्यांच्या आठ ठिकाणच्या किंमती हिशेबांत घेतल्या जातात! त्याचप्रमाणें गहू आणि टायर्स-ट्यूबची परिस्थिति (३ : ९) आहे. तांदुळाच्या हिशेबांतील तीन किंमतींपैकी दोन किंमती नियंत्रित आहेत आणि फक्त एक किंमत (पाटण्याच्या तांबड्या तांदुळाची) खुल्या बाजारांतील आहे. पाटण्याची किंमतहि पाटण्याच्या आसपासच्या ३०–४० मैलांत लागू आहे; त्याबाहेर तांदूळ पाठविण्यास बंदी आहे. गव्हाचीहि एकाच ठिकाणची किंमत खुल्या बाजारांतील आहे व तीहि स्थानिक महत्त्वाचीच आहे. औद्योगिक कच्च्या मालाचे गटांत कच्च्या कपाशीस अग्रस्थान दिलेलें आहे. भारतांतील गिरण्यांत एकूण जेवढी कपास वापरली जाते, तिच्यापैकीं एक तृतीयांश कपास इजिप्शन किंवा अमेरिकन असते व कित्येक कापडाच्या किंमती ठरवून दिल्या जातात त्या विदेशी कपाशीच्या किंमतीच्या आधारावरच. परंतु कपाशीच्या ज्या पांच किंमती इंडेक्ससाठी घेतल्या जातात, त्यांत विदेशी कपाशीच्या किंमतीस स्थान नाहीं. औद्योगिक पक्क्या मालांत कपास कापडास महत्त्वाचें स्थान आहे. त्याच्या इंडेक्स नंबराच्या बाबतींतहि परिस्थिति समाधानकारक नाहीं.

मालाच्या किंमतींच्या बाजारभावांत जे चढउतार होतात, ते इंडेक्स नंबरांत प्रतिबिंबित कसे व्हावयास पाहिजेत परंतु होत नाहींत हें "टाटा कार्टेली"नें दाखवून दिलें आहे. भारतासारख्या देशांत वस्तुस्थितिनिदर्शक आंकडे जमविणें ह्या गोष्टीस त्यापासून इंडेक्स तयार करण्याच्या शास्त्रशुद्धतेपेक्षां जास्त महत्त्व आहे. सरकारतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या आकडेवारी माहितीचा उपयोग करतांना त्यांतील उणीवा लक्षांत ठेवणें योग्य होईल. आहे त्या परिस्थितींत ह्यापेक्षा विश्वासार्ह आकडे मिळणें शक्य नाहीं, एवढ्या आश्वासनानें कार्यभाग होणार नाहीं.

## मध्यवर्ती सरकारचें ७५ कोटींचें कर्ज

भारत सरकारनें ७५ कोटी रुपयांचें नवें कर्ज उभारण्याची घोषणा केली आहे. पंचवार्षिक योजना पक्की झाल्यानंतर पहिल्यांदाच उभारण्यांत येणारें हें कर्ज 'नॅशनल प्लॅन बॉण्ड्स-फर्स्ट इशु' या नांवानें संबोधिण्यांत येईल आणि त्यावर प्राप्तीकर लागू असलेलें दरसाल दर शेंकडा ३॥ टक्के व्याज देण्यांत येईल. हें कर्ज दर शेंकडा ९८ रुपये ४ आ. या किंमतीस विक्रीस काढण्यांत येईल. १ जून १९६१ रोजीं त्याची फेड करण्यांत येईल. ८ जून पासून १० जून १९५३ पर्यंत रोखीच्या स्वरूपांत किंवा १९५३–५५ च्या ३ टक्के दराच्या कर्जाच्या स्वरूपांत रकमा स्वीकारण्यांत येतील. नव्या कर्जावरील व्याज दर सहामाहीस म्हणजे १ जून व १ डिसेंबर रोजीं देण्यांत येईल.

## एक्सप्रेस डिलिव्हरी पत्रावर संपूर्ण पत्ता

पोस्ट बॉक्सेसच्या पत्त्यांवर पाठविण्यांत आलेल्या वस्तु एक्सप्रेस डिलिव्हरी पद्धतीनें पाठवितां येत नाहींत. पोस्ट बॉक्स क्रमांकाच्या पत्त्यावर अशा तऱ्हेनें अनेक वस्तू पाठविण्यांत येतात व त्यांचा नेहमींच्या पद्धतीनें बटवडा करावा लागतो. अशा तऱ्हेनें पाठवावयाच्या वस्तू बटवडा कचेऱ्यांतून खास नोकरांकडून ताबडतोब देतां याव्यात म्हणून त्यांवर संपूर्ण पत्ता लिहिण्याची जनतेस विनंती पोस्ट खात्यानें केली आहे.

ब्रिटिश बँकर्सच्या दृष्टिकोनांतून

## भारताच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा

(१)

"भारत हें आपलें सर्वांत मोठें व जुनें कार्यक्षेत्र आहे. १९५२ साल हें हिंदी चहाच्या धंद्यास, त्यास भांडवल पुरविणाऱ्या बँकांना व सरकारला काळजीचें गेलें. एका वर्षापूर्वी सर्व कांहीं ठीक होतें. दीर्घकाळ हिंदी चहा मोठ्या प्रमाणावर, दर्जाची छाननी न होतां, विकला जात होता. त्यामुळें मानवी दुर्गुणास वाव मिळून वाईट पत्ती निर्गत होऊं लागली. ग्रेट ब्रिटनमध्यें चहावरील नियंत्रणें उठल्यावर आणि खुल्या लिलावांस प्रारंभ झाल्यावर सहाजीकच चांगल्या दर्जाच्या चहास चांगली किंमत येऊं लागली व वाईट चहाची किंमत एकदम घसरली. चहाच्या धंदेवाल्यांनीं ह्यावर उपाय-योजना तात्काळ सुरू केली, परंतु सरकारनें एक्साइज व निर्गत पट्ट्या कायम ठेवल्या. सुदैवानें, चहाचा ग्रेटब्रिटनमधील साठा वाटला, त्यापेक्षा कमी होता. त्यामुळें किंमती पुनः हळुहळु वाढूं लागल्या. चहाच्या धंद्यानें अल्पावधींत शिकविलेल्या धड्याचें मनन केलें पाहिजे. धान्याचें उत्पादन हा भारताचा सर्वांत मोठा व बिकट आर्थिक प्रश्न आहे. शेतीची पद्धति सुधारून, पाणीपुरवठा वाढवून आणि कृत्रिम खतांच्या वापरास उत्तेजन देऊन डोळ्यांत भरण्याइतकी नसली तरी कांहीं प्रगति झाली आहे. परंतु, सतत वाढणारी लोकसंख्या ह्या प्रगतीमुळें होणारी सुधारणा पूर्णतः नाहीं तरी बहुंशीं नष्ट करीत आहे. ह्या परिस्थितीस तोंड देण्याचा सरकारच्या पंचवार्षिक योजनेचा उद्देश आहे.

"पाकिस्तानला १९५१ साल जितकें चांगलें गेलें, तितकेंच १९५२ साल वाईट गेलें. त्यांतील धान्याचें पीक वाईट निघालें; पश्चिम पाकिस्तानांतील कपाशीच्या व पूर्व पाकिस्तानांतील तागाच्या किंमती एकसारख्या व तीव्र वेगानें खालीं आल्या. पूर्वींच्या भरभराटीमुळें आलेल्या उत्साहानें पाकिस्ताननें भरमसाट प्रमाणावर आयात होऊं दिली होती. सरकारचें हें धोरण माझ्या मतें चुकीचें होतें. परिस्थिति सुधारण्यासाठीं किंमती उचलून धरण्याचे प्रयत्न केले, त्यामुळें सरकारजवळ मोठे साठे उरले, त्यांत सरकारला मोठें नुकसान आलें. ही प्रवृत्ति सरकारच्या सत्वर ध्यानांत आली असती, तर त्याच्या अंदाजपत्रकांतील तूट कमी झाली असती आणि परराष्ट्रीय व्यापारांतील तफावतीस मजबुती आली असती. परिस्थिति सुधारण्यासाठीं पाकिस्तान सरकार अनावश्यक आयात नियंत्रित करून निर्गतीस प्रोत्साहन देऊं लागलें आहे. परंतु, ऐनजिनसी विनिमयाचा आधुनिक राष्ट्रानें अवलंब करणें मला पटत नाहीं. चलनांचें एकमेकांत रूपांतर करण्याच्या अडचणींचा हा एक परिणाम आहे, हें उघड आहे. भारत आणि पाकिस्तान ह्यांचेमधील व्यापार अगदीं बंद नसला तरी चालावा तसा चालू नाहीं, हें निश्चित.":—नॅशनल बँक ऑफ इंडियाचे चेअरमन मि. जे. के. मिची.

(२)

"भारतांतील ३५·६ कोटी प्रजाजनांपैकी पांचांतील चार लोक जमीन कसून त्यावर कशीबशी गुजराण करतात; त्यांची शेतीची पद्धति जुनीपुराणी व आधुनिक युगाच्या गरजांस अपुरी पडणारी आहे. लोकसंख्येंत दरसाल ४० ते ५० लाखांची भर पडत आहे. तेव्हां धान्याच्या उत्पादनांत मोठी भर घालणें ही भारताची आजची निकडीची गरज आहे. भारताच्या पंचवार्षिक योजनेंत स्वाभाविकच शेतीच्या उत्पादनवाढीवर भर देण्यांत आला आहे. ह्या योजनेंतील ६०% खर्च शेती, विकास-योजना, पाणीपुरवठा व वीज उत्पादन केंद्रें ह्यांवर होणार आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर त्यानें आर्थिक क्षेत्रांत बरीच प्रगति केली आहे. निर्गत होणाऱ्या मालाच्या उद्योगधंद्यांतील परिस्थिति अधिक स्थिर राहील, अशी आशा करूं या. कारण, आणखी घसरगुंडी झाली, तर अपेक्षा–आशा निर्माण करणाऱ्या पंचवार्षिक योजनेला लागणारा पैसा उभारणें सरकारास फार जड जाईल.":—चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया अँड चायनाचे चेअरमन, मि. व्ही. ए. ग्रँथॅम.

(३)

"गेलें वर्ष हिंदी मालाच्या निर्गतीस विशेष चांगलें गेलें नाहीं. तागाची किंमत खाली गेली आणि वर्षाचे आरंभीं आफ्रिका आणि मलाया येथें कपास कापडास असलेली मागणी पुढें मंदावली. कातड्यांची किंमत मात्र थोडी सुधारली. १९५१ व १९५२ मध्यें चहाच्या धंद्यास आलेल्या वाईट दिवसामुळें, कांहीं मळे बंद पडले. मळ्यांना उत्पादनखर्च बाजारभावाप्रमाणें कमी करूं दिला पाहिजे. त्यामुळें कांहीं मजूर कमी करावे लागले किंवा मजुरी कमी करावी लागली किंवा त्यांच्या सुखसोई कमी कराव्या लागल्या तरी हरकत घेतली जातां कामा नये.":—ईस्टर्न बँकेचे चेअरमन, सर इव्हॅन जेंकिन्स.

---

### सेन आणि शास्त्री अवार्ड ह्यांची तुलना

किमान आणि कमाल पगार (रु.)

| बँकांचा वर्ग | क्षेत्र १ | क्षेत्र २ | क्षेत्र ३ |
|---|---|---|---|
| अ | ८५ (९६) | ७३ (८२) | ६६ (७०) |
| | २८० (२९०) | २४५ (२४८) | २२७ (२१२) |
| ब | ७३ (९२) | ६६ (७८) | ५७ (६६) |
| | २४५ (२८५) | २२७ (२४३) | २०० (२०७) |
| क | ६६ (८६) | ५७ (८३) | ५४ (६२) |
| | २२७ (२६५) | २०० (२२५) | १९१ (१९१) |
| ड | ५७ (८६) | ५४ (८३) | ५१ (६२) |
| | २०० (२६५) | १९१ (२२५) | १८२ (१९१) |

कंसाबाहेरील आंकडा शास्त्री अवार्डचा व कंसांतील आंकडा सेन अवार्डचा आहे.

### लहान गांवांतील बँकिंग व शास्त्री अवार्ड

५०,००० लोकवस्तीपेक्षा कमी वस्ती असलेल्या गांवीं इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल (बँक डिस्प्यूटस) अवार्ड लागू नसावें, अशी रूरल बँकिंग चौकशी कमिटीची सूचना होती. ती शास्त्री ट्रायब्यूनलनें अमान्य केली आहे. त्यामुळें खालील नोकरांना फायदा होणार आहे:—

| लोकसंख्येची मर्यादा | नोकरांची संख्या |
|---|---|
| २५,००० ते ५०,००० | ४,४७० |
| १०,००० ते २५,००० | ३,६१६ |
| १०,००० पेक्षा कमी | १,१९४ |
| इतर | ३०८ |
| एकूण | ९,५८८ |

## मद्रास राज्यामधील स्त्रियांचा नोकरीचा शोध

मद्रास राज्यांत बेकारांची संख्या एकसारखी वाढत चालल्याचें दिसतें. सरकारी खात्यांत नोकऱ्या मिळविण्याची धडपड करणाऱ्या आणि खाजगी उद्योगधंद्यांत शिरूं इच्छिणाऱ्या सर्वच उमेदवारांची संख्या फुगत चालली आहे. पुष्कळशा बायकांनीं लग्न करण्याऐवजीं उच्च शिक्षण घेतलेलें आहे. परंतु त्यांना असें आढळून येत आहे कीं नोकऱ्या फारशा नाहींतच. उद्योग-विनिमय केंद्रांवर बायकांची गर्दी उडालेली दिसते. १९५० सालीं मद्रास राज्यांत १,८६५ स्त्रियांनीं नोकरीसाठी नांवें नोंदविलीं होतीं. १९५२ सालीं ही संख्या २,९६२ झाली आहे. टेलिफोन ऑपरेटर्स, कारकून, शिक्षक, नर्सेस, प्रसूति मदतनीस, लघुलेखक, टंकलेखक, संशोधन-मदतनीस, इत्यादी अनेक प्रकारच्या जागांसाठी स्त्रिया अर्ज करीत आहेत. त्यांतल्या त्यांत कारकून, नर्सेस, टंकलेखक, आणि बिन-वाकबगार कामगार ह्यांच्या जागांसाठी अधिक अर्ज करण्यांत येतात. सुशिक्षित स्त्रियांचें कार्यक्षेत्र घरांत कीं घराबाहेर, असा प्रश्न नेहमीं विचारण्यांत येत असतो. मद्रासमधील एका स्थानिक वृत्तपत्रानें ह्या प्रश्नासंबंधीं पहाणी केली असतां स्त्रियांचें पहिलें आणि महत्त्वाचें कार्यक्षेत्र घर हें आहे असें सर्वसामान्य मत दिसून आलें. तथापि कुटुंबावर एखादा भलाबुरा प्रसंग आल्यास स्त्रियांच्या शिक्षणाचा उपयोग होतो असेंहि मत व्यक्त करण्यांत आलें आहे. स्त्रियांनीं घराबाहेर काम करावयाचेंच ठरविलें तर वैद्यक, शिक्षण, शुश्रूषा अगर कांहीं प्रकारचें सामाजिक काम ह्या क्षेत्रांत करावें अशीहि एक विचारसरणी व्यक्त करण्यांत आली. कांहीं जणांचें मात्र असें ठाम मत दिसून आलें कीं स्त्रियांनीं घराच्या सुरक्षित वातावरणांतच राहिलें पाहिजे. सध्यांच्या आर्थिक परिस्थितींत स्त्रियांनीं धनार्जन करावें कीं नाहीं हा प्रश्न अर्थातच विचारांच्या पलीकडे गेलेला आहे.

## भारताच्या पोलादाच्या उत्पादनाला मदत

ऑस्ट्रिआचे भारतामधील राजनैतिक प्रतिनिधी हर लेंक हे नुकतेच द. भारताच्या दौऱ्यावर गेले होते. आपल्या प्रवासांत त्यांनीं बंगलोर, म्हैसूर, उटकमंड, भद्रावती, हैदराबाद इत्यादि शहरांतील उद्योगधंद्यांची पहाणी केली. पोलादाच्या उत्पादनांत ऑस्ट्रिआ भारताला काय प्रकारानें मदत करूं शकेल ह्यासंबंधीं त्यांनीं कांहीं विचार व्यक्त केले आहेत. भारतानें आर्थिक उद्धारासाठी आखलेल्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा उल्लेख करून ते म्हणाले कीं, हा कार्यक्रम पार पाडतांना लोखंड व पोलादाच्या उत्पादनांत वाढ करणें अर्थातच फार अगत्याचें आहे. भारताला अमेरिका व इतर देश सल्ला देतच आहेत. तथापि ऑस्ट्रिआ भारताला कांहीं उपयुक्त मदत करू शकेल असें त्यांना वाटतें. पोलाद तयार करण्यासाठी ऑस्ट्रिआ कांहीं नवीन प्रकारची पद्धत वापरतो. त्या पद्धतीचा भारताला फार उपयोग होईल असें त्यांना वाटतें. भद्रावती येथील कारखान्याला भेट दिल्यानंतर ही पद्धत भारतांत कशी काय अंमलांत आणतां येईल ह्यासंबंधी विचार करतां येईल. हर लेंक ह्यांच्याबरोबर ऑस्ट्रिआचे भारतामधील व्यापारी कमिशन हर स्मिडट् हेहि आहेत. द. भारतामधील औद्योगिक कारखान्यांची पहाणी करून त्यांना ऑस्ट्रिआतर्फे कांहीं मदत देतां आल्यास पहावी अशा उद्देशानें हा दौरा काढण्यांत आला असल्याचें समजतें. बंगाल-विहारमधील लोखंड-पोलादाचे कारखाने सोडल्यास भारतांत असे कारखाने निघण्याची शक्यता द. भारतांतच अधिक आहे. शिवाय द. भारतांत विजेसारखी औद्योगिक शक्तीहि उपलब्ध आहे.

## कृत्रिम तांदुळाच्या निर्मितीचें यंत्रसाहित्य

भारतामधील तांदुळाचा अपुरा पुरवठा लक्षांत घेऊन म्हैसूर येथील सेंट्रल फूड टेक्नॉलॉजिकल रिसर्च इन्स्टिटयूटनें कृत्रिम तांदूळ निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला होता. टॅपिओकाच्या पिठापासून असा तांदूळ बनविण्यासाठी कांहीं यंत्रसाहित्याची जरूरी होती. योग्य त्या प्रकारची यंत्रसामुग्री कोठें मिळेल तें पहाण्यासाठी इन्स्टिटयूटचे डायरेक्टर डॉ. सुब्रम्हण्यम् इंग्लंड आदिकरून प. युरोपांतील देशांच्या दौऱ्यावर गेले होते. आपला दौरा संपवून ते नुकतेच स्वदेशीं परत आले आहेत. डॉ. सुब्रम्हण्यम् म्हणतात कीं, कृत्रिम तांदूळ बनविण्याच्या कामीं ब्रिटनमध्यें जे प्रयोग करण्यांत आले ते यशस्वी झाले नाहींत. स्वित्झरलंडमध्यें भारतामधून टॅपिओकाचें पीठ पाठविण्यांत आलें होतें. तेथें मात्र एका कारखान्यानें पिठापासून कृत्रिम तांदूळ बनविण्याच्या कामीं यश मिळविलें आहे. ह्या कारखान्यानें जी यंत्रसामुग्री तयार केली आहे तिचा उपयोग करून एका तासांत अर्धा टन तांदूळ निर्माण करतां येतो. ही यंत्रसामुग्री पुरविणें त्या कारखान्याला शक्य असून पुढील निर्णय आतां भारत सरकारनें घ्यावयाचा आहे. कारखान्याच्या चालकांचें असें मत आहे कीं, भारताकडून कच्चा माल आणवून स्वित्झरलंडमध्यें त्यापासून तांदूळ तयार करणें फार खर्चाचें होईल. त्यापेक्षा कारखान्यानें तयार केलेलीं यंत्रेंच भारतांत नेऊन बसविणें अधिक सोईचें होईल. डॉ. सुब्रम्हण्यम् ह्यांनीं ह्यासंबंधीचा अहवाल भारत सरकारकडे पाठविला आहे. भारत सरकारचा निर्णय झाल्यावर मगच कृत्रिम तांदुळाच्या उत्पादनाचा कारखाना उभारावयाचा किंवा काय हें ठरणार आहे.

## जर्मन तंत्रज्ञांना अमेरिकेंत बोलावणें

गेल्या महायुद्धांत जर्मनीनें रॉकेटसचा शोध लावला आणि अजूनहि ह्या क्षेत्रांत आघाडी मारण्याची महत्त्वाकांक्षा जर्मन संशोधकांनीं सोडली आहे असें नाहीं. रॉकेटस तयार करणाऱ्या तंत्रज्ञांना अमेरिकेंत येण्याविषयीं बरींच प्रलोभनें दाखविण्यांत येत आहेत. जर्मन तंत्रज्ञ अमेरिकेंत आल्यास त्यांना दर आठवड्याला ७० पौंड पगार, रहाण्यास चांगलीं घरें, जाण्यासाठी पहिल्या वर्गाचें भाडें, इत्यादि आमिषें दाखविण्यांत आलीं आहेत. परंतु तज्ज्ञ त्यांना भुलून अमेरिकेस जाण्यास तयार नाहींत. जर्मन सोसायटी फॉर स्पेस रिसर्च ह्या संस्थेचे अध्यक्ष डॉ. हेपनेर ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, संस्थेच्या १७ सभासदांना अमेरिकेंत येण्याविषयीं विनंति करण्यांत आली होती. मनुष्यसहित आणि मनुष्यविरहित रॉकेटस् तयार करण्यासाठी अमेरिकन कारखानदारांना जर्मन तज्ज्ञांची गरज भासत आहे. हिटलरनें व्ही टू रॉकेटस् सोडण्यासाठी जे तळ उभारले होते. त्यावर काम केलेल्या माणसांपैकी कांहीं माणसें अजूनहि जर्मनींत आहेत. जर्मन सरकारला असा विश्वास वाटतो कीं, जर्मनीमधील रॉकेट, राडर आणि विमानविषयक संशोधनावर सध्या जी बंदी आहे ती लवकरच उठविण्यांत येईल. म्हणूनच वरील तंत्रज्ञ परदेशीं जाण्यास तयार नसावेत. ह्या क्षेत्रांत आपण आपलें पूर्वीचें अग्रस्थान परत मिळवूं शकूं अशी खात्री त्यांना वाटते. जर्मन कारखानदारांकडून ह्या तंत्रज्ञांना लवकरच आर्थिक साहाय्य मिळूं लागेल असें समजतें. तसें झाल्यास आकाशयानाबाबत जगांत सध्या जें संशोधन होत आहे, त्यांत जर्मनी पुन्हां जोरानें भाग घेऊं लागेल

# चिरमुले निकेतनाचें उद्‌घाटन

## वेस्टर्न इंडियाच्या नव्या इमारतीचें वैशिष्ट्य

### विमामहर्षींच्या कार्यपद्धतीचा गौरव


पंधरा वर्षांपूर्वी १९३८ सालीं एप्रिल महिन्यांत मुंबई येथें, वेस्टर्न इं. कंपनीनें नवीनच बांधलेल्या प्रचंड आणि सुंदर इमारतीचा उद्‌घाटन समारंभ झाला. त्यापूर्वी विमा कंपनीच्या इमारती नव्हत्या असें नव्हे. सातारा येथें १९१९ सालींच कंपनीनें इतिहासप्रसिद्ध चिटणीस घराण्याचा वाडा आपल्या कचेरीसाठी खरेदी केला होता; व कितीएक वर्षेपर्यंत कंपनीच्या वाढत्या कारभाराचा व्याप त्याच इमारतींत सामावला होता. पुढें त्याच इमारतीच्या पाठीमागें एक नवी इमारत १९३६ सालीं बांधण्यांत आली. याशिवायहि एक इमारत १९३८।३९ सालच्या सुमारास मुख्य कचेरीच्या सोयीसाठी सातारा येथें बांधली गेली. लौकरच, म्हणजे येत्या दिवाळीच्या आसपास, पुणें येथें कंपनी स्वतःचे कचेरीसाठी बांधीत असलेली इमारत पूर्ण होऊन तिचा उद्‌घाटन समारंभ पुणें येथें व्हावयाचा आहे.

### विमाव्यवसायाचीं पथ्यें

कै. अण्णासाहेबांनीं पहिल्यापासून विमा-व्यवसायाचीं कांहीं पथ्यें म्हणून ठरवून तीं कडकपणें पाळण्याचें व्रत स्वीकारलें होतें. "नवीन येणाऱ्या कामाचा प्रवाह माफक असला तरी त्याबद्दल बिलकूल कांहीं वाटून घेण्याचें कारण नाहीं. परंतु नवीन काम मिळविण्यासाठी भला मोठा आणि प्रमाणाबाहेर खर्च करण्याची प्रवृत्ति अगदीं कटाक्षानें टाळली पाहिजे." त्यांनीं घालून दिलेलें वरील धोरण अतिशय कटाक्षानें पाळलें जात होतें व तें पाहून त्यांना संतोष होत होता. त्यांच्या पाठीमागेंहि या धोरणाची कास कंपनीच्या चालकांनीं घट्ट धरून ठेवलेली आहे.

या धोरणामुळें डोळे दिपवून टाकणारे नव्या कामाचे आंकडे वेस्टर्न इंडिया विमा कंपनीला केव्हांच दाखवितां आले नाहींत. कितीएक नवीननवीन स्थापन झालेल्या कंपन्यांनीं या बाबतींत वेस्टर्न इंडियाला मागें टाकलें असेंहि केव्हां केव्हां कोणाला वाटलें. परंतु गेल्या पंधरा वर्षांतील मोठ्या कंपन्यांचे नवीन कामाचे आंकडे पाहिले तर वेस्टर्न इंडियानें या नवीन कामाच्या क्षेत्रामध्येंहि एकसारखी प्रगतीच केली आहे असें आढळून येईल. आपलें सावधपणाचें धोरण न सोडतांहि प्रमाणशीर कामवाढीची ही जी प्रगतिकारकता वेस्टर्न इंडिया विमा कंपनीनें कायम ठेवली आहे ती कंपनीची प्रतिष्ठा वाढविणारीच एक गोष्ट आहे.

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचें माफक खर्चाचें धोरण दुहेरी आहे. प्रत्यक्षांत खर्च तर कमी करावयाचाच आणि तरीहि विमेदारांकडून हप्त्याच्या रूपानें अतिशय माफक अशी रकम वसूल करावयाची; विमेदारांकडून अकारण जास्त रकम वसूल करावयाची व मग त्यांपैकी खर्च करून थोडी अधिक त्याला बोनसच्या रूपानें परत करावयाची हें कांहीं खरें काटकसरीचें धोरण नव्हे व त्यामध्यें त्यांचें हितही नव्हे. तर विमेदाराकडून कमींत कमी हप्त्याची रकम घ्यावयाची, त्या रकमेंतून अत्यावश्यक तेवढाच माफक खर्च करावयाचा आणि बोनसाच्या रूपानें अधिकांत अधिक रकम पोंचती करावयाची हें धोरण खरें काटकसरीचें आणि विमेदाराच्या खऱ्याखुऱ्या हिताचें आहे. हें विमेदाराच्या अत्यंत हिताचें धोरण अखिल भारतांत वेस्टर्न इंडियानें ज्या प्रमाणांत सांभाळलें आहे त्या प्रमाणांत इतर कोणीहि सांभाळलेलें नाहीं. वेस्टर्न इंडिया कंपनी ही अजूनहि

SAVE to help yourself and the NATION
WITH THE

HOME SAFE
THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum

एखादा अपवाद सोडला तर अधिकांत अधिक बोनस देत आलेली आहे.

तेव्हां नव्या कामाची डोळे दिपविणारी वाढ करण्याच्या धडपडींत आवश्यक खर्चाबरोबरच मृत्यूच्या संख्येंत होणारी अनपेक्षित वाढ हाहि एक धोका आहे. आणि हाही धोका घडूं यावयाचा नाहीं हें एक कै. अण्णासाहेबांचें धोरण आहे आणि आजतागयत वेस्टर्न इंडियानें हें धोरण मोठ्या कसोशीनें पाळलें आहे. अपेक्षित प्रमाणापेक्षा वेस्टर्न इंडियाला मृत्यूमुळें होणारे क्लेम्स बऱ्याच कमी प्रमाणांत द्यावे लागतात आणि त्यामुळें जास्त नफा मिळण्याला खास मदत होते.

आपल्या धोरणाचें दुसरें तत्त्व कै. अण्णासाहेबांनीं आपल्या ज्युबिलीच्या भाषणांत स्पष्टपणें सांगितलें तें असें:— वरील गैरवाजवी व अप्रमाण खर्च न करण्यांतूनच दुसरें एक धोरण अनुस्यूत होतें. तें म्हणजे कंपनीचे जवळ जमा होणाऱ्या रकमा ज्यांच्या सुरक्षितपणाबद्दल यत्किंचितहि शंका घेतां येणार नाहीं अशा तारणामध्येंच गुंतविणें हें होय.

रकमा गुंतविण्याच्या बाबतींतील हें आपलें धोरण आमरण अत्यंत कसोशीनें त्यांनीं पाळलें व त्याच धोरणाचा पाठपुरावा त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनीं व अधिकाऱ्यांनीं सतत केला. फाजील सावधपणाबद्दल कोणी कोणी दोष दिला तरी तो हंसत हंसत सहन केला. सट्टेबाजीला लवभरहि अवसर मिळूं दिला नाहीं. "अशा तऱ्हेची प्राप्ति माझ्या कंपनींत मला मुळींच नको आहे. हा मार्ग आपला नाहीं" असें आपल्या कांहीं सहकाऱ्यांना त्यांनीं अधून मधून खणखणीतपणें बजावलें आणि विमेदारांचा आपल्या हातींचा विश्वस्तनिधि अत्यंत सुरक्षित ठेवला.

### नव्या इमारतीची वैशिष्ट्यपूर्ण योजना

ज्या इमारतीचा उद्‌घाटन समारंभ झाला, ती इमारत कै. अण्णासाहेब चिरमुले यांच्या स्मृतीचें एक प्रतीक म्हणून बांधलेली आहे. विमाकंपनीवर त्यांचे इतके अनंत उपकार आहेत कीं, त्याबद्दल कृतज्ञता दाखविण्याचे जेवढे सुचतील तेवढे मार्ग अनुसरले तरी ते कमीच पडतील. विमा कंपनी व त्यांच्या बँका आणि त्यांची आवडती ट्रस्टी कंपनी हीं तर त्यांचीं चालतीं बोलतीं स्मारकें आहेतच. त्याचप्रमाणें त्यांच्या ऐंशीव्या वाढदिवसाच्या निमित्तानें स्थापन झालेली चिरमुले इन्शुअरन्स-इन्स्टिट्यूट ही संस्थाहि त्यांचें आणखी एक स्मारक राहील. अशा या स्मारकांच्या भरीला ही इमारत हें आणखी एक त्यांचें स्मारक असून त्या इमारतीकडे या पवित्र भावनेनेंच पाहिलें जाणें हें योग्य होईल; आणि इमारत पण त्यांच्या स्मारकाला अत्यंत योग्य अशी उभारली गेली आहे हें कोणीहि सहृदय माणूस कबूल करील.

बाहेरून खडबडीत अशा या इमारतीच्या आंत असणाऱ्या अनेक आणि बहुविध अशा आधुनिक सोयी कै. अण्णासाहेबांच्या आंगचे हळुहळू स्पष्ट होणारे अनेक गुण अनुभवून आपण असेच चकित होत होतो याची आपणांस आठवण करून देतील.

या इमारतींत आंत गेल्यावर साताऱ्यांत बहुतांशीं नवी गोष्ट म्हणजे त्यांतील भव्य तळघर हें प्रथम लक्षांत येईल. त्यांत लौकरच सेफ डिपॉझिट व्हॉल्ट म्हणजे मौल्यवान वस्तु ठेवण्यासाठी सुरक्षित अशी कोठी तयार करण्यांत येणार आहे.

तळघर बाजूला टाकून वर जातांच लिफ्ट म्हणजे यांत्रिक पाळणा दिसेल.

तेथून वरच्या मजल्यावर जातांच दोन्ही बँकांच्या भव्य व सुसज्ज कचेऱ्या दिसतील. आज ना उद्यां बँकांना अशी नवी जागा मिळणें हें आवश्यक होतें. आणि अशी जागा साताऱ्च्या दृष्टीनें योग्य भाड्यांत, परंतु बांधकामाच्या खर्चाच्या दृष्टीनें अतिशय अल्प भाड्यांत वेस्टर्न इंडिया कंपनीनेंच या संस्थांना उपलब्ध करून दिली हें कै. अण्णासाहेबांच्या स्मारकाच्या दृष्टीनें आणखी एक विशेष उचित कृत्य झालें असेंच कोणालाहीं वाटेल.

याच्या वरच्या मजल्यावर दोन भव्य दिवाणखाने आहेत; दोन मोठ्या खोल्या व एक छोटी खोली आहे. मोठ्या खोल्यांत चिरमुले इन्शुअरन्सचे वर्ग राहावयाचे आहेत. दिवाणखान्यांपैकी एकांत विमा कंपनीचें ग्रंथालय व वाचनालय राहावें आणि तें चांगलें समृद्ध असावें अशी योजना आहे. रस्त्याकडेच्या दिवाणखान्यांत कंपनीच्या भागिदारांच्या सभा, डायरेक्टरांच्या सभा, ऑडिटर्सचीं कामें, अशी विविध कामें होणार आहेत.

परंतु सातारकरांच्या दृष्टीनें सर्वांत अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे तळमजल्यावरचें टपाल व तारघर ही होय. हें मध्यवर्ती टपालघर शहरांत या भव्य रस्त्यावर आलें यानें व्यापाऱ्यांची आणि जनतेची केवढी मोठी सोय होणार आहे.

कै. अण्णासाहेबांच्या परंपरेला हें सर्वस्वीं साजेसेंच आहे. या कंपनीबद्दल बोलतांना श्री. मोक्षगुंडम् विश्वेश्वरय्या यांनीं अचूकपणें म्हटलें कीं, "कंपनीच्या कार्याचा आणि मिळकतीचा व्याप एवढा मोठा वाढला आहे तरीही तिच्या पोटांत दस-लाखांची मालकी कोणी प्रस्थापित केली नाहीं. श्री. चिरमुले यांनीं या बाबतींत एकत्रकुटुंबी प्रवृत्तीनें काम करणें, सततोद्योग, निष्ठा आणि स्वार्थत्याग यांचा उच्च आदर्श आपल्या कंपनीपुढें ठेवला आहे आणि स्वतःच त्या बाबतींतील अनुकरणीय उदाहरण घालून दिलें आहे."

आपल्या सावधपणाच्या धोरणावर कितीएक मित्रांकडूनही विरोधी टीका होते त्याला उद्देशून ते रौप्य-महोत्सवाच्या भाषणामध्यें म्हणाले, "शुद्ध मार्गानें मनुष्य जात असला म्हणजे तो इच्छित स्थळीं सुरक्षितपणें पोंचलाच पाहिजे." तथापि सावधपणा म्हणजे प्रगतिशून्यता असा कांहीं त्याचा अर्थ नव्हता. उलट कंपनी जसजशी वाढत आहे आणि बलवान होत आहे तसतसा आरंभीं आवश्यक वाटलेल्या सावधपणाच्या धोरणांत बदलही होत आहे व तसा तो झालाच पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. किंबहुना प्राथमिक अवस्थेंत जीं साधनें आवश्यक होतीं, परंतु जीं आतां गंजून गेलीं आहेत त्याच साधनांचा उपयोग करून आपण यापुढची प्रगति करूं असें मानण्याच्या वृत्तीचा तीव्र निषेध त्यांनींच अलीकडे संचालकांकडे मुद्दाम केलेल्या एका निवेदनांत केला होता.

### मध्य प्रदेश को.-बँक लि., नागपूर.

वरील बँकेनें १२ लक्ष रुपयांचीं ४% दराचीं फर्स्ट मॉर्टगेज डिबेंचर्स विक्रीस काढलीं आहेत. मध्यप्रदेश सरकारनें मुद्दल व व्याज ह्यांची हमी घेतली आहे. परतफेड १ जून, १९६३ रोजीं होईल. मध्यप्रदेशाच्या सहकारी खात्याचे रजिस्ट्रार हे डिबेंचर होल्डर्सच्या वतीनें ट्रस्टी आहेत. मध्यप्रदेशांतील प्रत्येक सहकारी लँड मॉर्गेज बँकांनीं दिलेलीं गहाणें त्यास तारण आहेत. पहिलीं पांच वर्षे डिबेंचर्स रिडीम केलीं जाणार नाहींत. सरकारनें डिबेंचर्सना ट्रस्टी रोख्यांचा दर्जा दिला असल्यानें ट्रस्ट फंड त्यांत पैसे गुंतवूं शकतात. डिबेंचर्स वर्ग करतांना स्टँपड्यूटी पडणार नाहीं. १००, ५००, १०००, ५०००, १०,०००, २५,००० अशा पाहिजे त्या किंमतींचे डिबेंचर्सचे कागद मिळूं शकतील.

---

### दि बुधगांव बँक लि., बुधगांव

वरील बँकेस १९५२ मध्यें १३,११२ रु. नफा झाला. रिझर्व्ह फंडांत ३,००० रु. टाकून; ३½% करमाफ डिव्हिडंड साठी ३,५०० रु. चा विनियोग करून; ४,००० रु. चो इनकम टॅक्सची तरतूद करून १,६२५ रु. इनव्हेस्टमेंट फ्लक्च्युएशन फंडाकडे वर्ग करण्यांत आले. त्या फंडांतून आणखीहि २½% डिव्हिडंड देण्याचें ठरलें. ( चेअरमन : रावबहादुर व्ही. व्ही. यारगोप, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर : आर. एम्. गोकवे ).

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १,००,००० | कॅश, बँकांत | २,९५,४४१ |
| रिझर्व्ह, इतर फंड | ९९,७७५ | इन्व्हेस्टमेंट्स | १,९१,१८० |
| ठेवी | ८,५३,३४७ | कर्जे | ५,७०,७६७ |

**B. M. COLLEGE OF COMMERCE, POONA -4**

The College will open for the new academic year in the new buildings on 20th June 1953. Students desirous of taking the Commerce Course after their S. S. C. examination should apply immediately in the prescribed form with the admission fee of Rs. 22/-. The prospectus giving detailed information about the courses and rules of admission to different classes can be obtained from the office for SIX ANNAS.

Under the new Ordinances of the Poona University a commerce graduate can appear for B. A. examination without keeping terms in an arts college.

T. M. Joshi
Principal.

**DECCAN INSTITUTE OF COMMERCE**
**594 Budhwar Peth, Poona 2.**

Opens for the 1953-54 Session on Monday the 22 June 1953.

Students coached up for G. C. D., L. C. C., D. Com., C. A. (First Part); G. D. C. and A., Dip. I. A., C. A. I. I. B.; Shorthand; Typewriting Examinations. Morning and Evening classes.

Admission to respective Diploma Courses open to Matriculates, Under-graduates and Graduates.

Prospectus free on application to the Secretary.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

मोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याशिवाय पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.



## बँक ऑफ पूना लि.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

### —संचालक मंडळ—

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

शाखा—( १ ) भवानी पेठ, पुणें. ( २ ) सदाशिव पेठ, पुणें. ( ३ ) सोलापूर ( ४ ) सांगली.

व्याजाचे दर—चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेवः—बँक १ ते ३ वर्षें मुदतीच्या ठेवी स्वीकारते. व्याजाबद्दल चौकशी करावी.

एक वर्षापेक्षा कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २.

गो. गं. साठे,
मॅनेजर.



## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर.

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,१०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B.
मॅनेजर



## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्लें, मालवण, नंदगड, गढहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, टिळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | १,९०,००० |
| ठेवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९२,९३,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्यें अद्ययावत पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५३ पासून सुरू झाला.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.
ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.
एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.